महाराष्ट्र टाइम्स

Date:03/09/2014

# आयआयटी मुंबईकडून घोडावत पॉलिटेक्निकचा गौरव

**कोल्हापूर :** आंयआयटी मुंबईच्या स्पोकन ट्युटोरीअल या प्रोजक्टच्या अंतगर्त विविध प्रकारच्या कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या प्रोजेक्टच्या अंतर्गत संजय घोडावत पॉलिटेक्निकमध्ये विविध कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. या उपक्रमात सहभाग घेतल्याबद्दल आयआयटी मुंबईने संजय घोडावत पॉलिटेक्निकचा गौरव केला असून आयआयटी मुंबई स्पोकन ट्युटोरिअल प्रोजेक्टसाठी रिसोर्स सेंटर म्हणून मान्यता देण्यात आली आहे. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी या कार्यशाळा घेण्यात येतात. विद्यार्थ्यांचे तांत्रिक क्षेत्रातील ज्ञान वाढावे आणि विद्यार्थी प्रगत व्हावेत यामध्ये सहाय्य केल्याबद्दल आयआयटीने संजय घोडावत पॉलिटेक्निकचा गौरव केला आहे. संस्थेच्या यशाबद्दल विश्वस्त विनायक भोसले आणि चेअरमन संजय घोडावत यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.